# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण

(महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ चे कलम ३ अन्वये स्थापित वैधानिक प्राधिकरण)

## Maharashtra Water Resources Regulatory Authority

(A Statutory Authority Established u/s 3 of Maharashtra Water Resources Regulatory Authority Act, 2005)


क्र. मजनिप्रा/२०१९/प्र.मा./विपाविम/११४/४३८ दिनांक : ०३/०६/२०१९

प्रति,

**कार्यकारी संचालक**
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,
सिंचन सेवा भवन, सिव्हील लाईन्स,
नागपूर-४४० ००१.

विषय : चिचोली व हिंगणा उपसा सिंचन योजना, जि. नागपूर आणि काटी खमारी उपसा सिंचन योजना, जि. भंडारा, - यांस मजनिप्राची मान्यता मिळणेबाबत.

संदर्भ : १) आपले पत्र क्र. ३६०८/विपाविम/कातां-६(१)/चिचोली उसिंयो/ मजनिप्रा प्रस्ताव/२०१९ दि. १०/०४/२०१९
२) आपले पत्र क्र. ३६०९/विपाविम/कातां-६(१)/काटी खमारी उसिंयो/ मजनिप्रा प्रस्ताव/२०१९ दि. १०/०४/२०१९
३) आपले पत्र क्र. ३६१०/विपाविम/कातां-६(१)/हिंगणा उसिंयो/ मजनिप्रा प्रस्ताव/२०१९ दि. १०/०४/२०१९
४) मजनिप्रा चे पत्र क्र. मजनिप्रा/२०१९/प्र.मा./विपाविम/१०७/३३४ दि. ०२/०५/२०१९

उपरोक्त संदर्भीय पत्र क्र. १ ते ३ अन्वये चिचोली (तालुका मौदा, जिल्हा नागपूर), व हिंगणा (तालुका मौदा, जिल्हा नागपूर) आणि काटी खमारी (तालुका मोहाडी, जिल्हा भंडारा) उपसा सिंचन योजना (उसिंयो) यांस मजनिप्राची मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव सादर केलेले होते.


**9th & 11th Floor, Centre-1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai-400005.**
**Tel.: +91-22-2215 2019, Email : mwrra@mwrra.in I Website : www.mwrra.org**

कृपया सदर प्रकरणी प्राधिकरणाचे विषय साधर्म्य असलेले संदर्भिय पत्र क्र. ४ (बिड चिचघाट, सिहोरा, माथानी व बाबदेव उसिंयो, जि. नागपूर - यांस मजनिप्राची मान्यता मिळणेबाबत) अवलोकनार्थ सोबत जोडलेले आहे. सदर पत्रातील खालील मुद्दे विषयांकित प्रकरणीसुद्धा लागू होतात.

१) मजनिप्रा अधिनियम २००५ चे कलम १६ नुसार दि. ११/०२/२०१९ रोजी राज्य जल परिषदेकडून एकात्मिक राज्य जल आराखडा मंजूर झालेला आहे. तथापि, का.सं. विपाविम नागपूर यांनी ५ वर्षाने होणाऱ्या पुनर्विलोकनाच्यावेळी विषयांकित उसिंयोंचा समावेश करण्यात येईल असे नमूद केले आहे. कार्यकारी संचालकांचा हा खुलासा मान्य करता येत नाही. मंजूर एकात्मिक राज्य जल आराखड्यामध्ये भविष्याकालीन प्रकल्पांची यादी उपलब्ध नाही. त्यामुळे प्रस्तावित प्रकल्पांची एकात्मिक राज्य जल आराखड्याशी सुसंगतता कशाचे आधारे पडताळावी हा प्रश्न निर्माण होतो. एकात्मिक राज्य जल आराखडा तयार करतांना भविष्यकालीन प्रकल्पांचा कसा विचार झाला आहे याबाबत सदस्य सचिव, राज्य जल परिषद यांनी खुलासा करणे आवश्यक आहे.

२) चौराई धरणामुळे पेंच प्रकल्प स्थळी कमी येवा येत असल्याने पेंच प्रकल्पाचे सुधारित पाण्याचे नियोजन करणे आवश्यक आहे.

३) संपूर्ण लाभक्षेत्रावर सुक्ष्म / ठिबक सिंचन प्रस्तावित केले आहे. तथापि लाभक्षेत्रात मुख्य पिक धान / गहू आहेत. या पिकांसाठी सुक्ष्म / ठिबक सिंचनाची व्यवहार्यता कृषी विभागाचे सल्ल्याने पडताळावी.

४) सदर उसिंयोंमधून फक्त खरिपामध्ये पाणी सौर पंपाद्वारे उचलणे प्रस्तावित असल्याचे मुख्य अभियंता यांनी स्पष्ट केले. सौर पॅनेलसाठी आवश्यक जमिनीचे नियोजन प्रस्तावामध्ये अंतर्भूत करणे आवश्यक असून खरिप हंगामामध्ये सौर उर्जेचे उपलब्धते बाबत खातरजमा करणे गरजेचे आहे. तसेच, कृषी क्षेत्रासाठी Net-Metering ही संकल्पना अनुज्ञेय आहे का याची खातरजमा करणे आवश्यक आहे.

५) विषयांकित उसिंयोचे लाभ-व्यय गुणोत्तर काढतांना पेंच प्रकल्पाची किंमत Equal Footing वर घेतलेली नाही. जुनी गुंतवणुक सुमारे ४० वर्षापूर्वीची आहे.

६) सध्या खात्रीने प्रकल्पाचे पाणी कालव्याद्वारे मिळाणाऱ्या लाभधारक शेतकऱ्यांना नविन उपसा सिंचन योजनाचा पर्याय देणेपेक्षा नागपूर महानगरपालिकेने पर्यायी स्त्रोतामधून पाणी उचलण्याचा पर्याय अधिक व्यवहार्य वाटतो.

उपरोक्त मुद्यांचा विचार करता तसेच बिड चिचघाट, सिहोरा, माथानी, बाबदेव, चिचोली व हिंगणा उसिंयो, जि. नागपूर आणि काटी खमारी उसिंयो, जि. भंडारा या सात उसिंयोंचा एकात्मिक राज्य जल आराखड्यामध्ये समावेश नसल्याने मजनिप्रा अधिनियम कलम ११(च) अन्वये सदर सात उसिंयोंना मान्यता देता येत नाही. सबब विषयांकित प्रस्ताव परत पाठविण्यात येत आहे.

सोबत - वरीलप्रमाणे

(रसिक चौहान)
सचिव, मजनिप्रा

प्रत माहितीसाठी व योग्य कार्यवाहीसाठी

सचिव (जसंव्य व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, मुंबई - ४०००३२ [लक्ष्यवेध - श्री. र. रा. शुक्ला, उपसचिव (जसं.)]

२/- प्राधिकरणाचे संदर्भिय पत्र क्र. ४ मधील मुद्दा क्र. १ चे अनुषंगाने सदस्य सचिव, राज्य जल परिषद यांचे खुलाश्यासाठी सादर.

सोबत - प्राधिकरणाचे संदर्भिय पत्र क्र. ४

प्रत माहितीसाठी व योग्य कार्यवाहीसाठी

१) मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, सिंचन सेवा भवन, जुने सचिवालय परिसर, सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१.

२) अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, वैनगंगानगर, अंजनी, नागपूर - ४४० ००३.

३) कार्यकारी अभियंता, पेंच पाटबंधारे विभाग, वैनगंगानगर, अंजनी, नागपूर - ४४० ००३.